दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १५३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.२७ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

### देशातील जनता भाजपला कंटाळलीय ....
## काँग्रेस पक्ष हाच सक्षम पर्याय : नाना पटोले

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**काँग्रेस पक्ष हा राष्ट्रीय पक्ष असून सर्वात जुना आणि मोठा पक्ष आहे. राज्यातील परिस्थिती सध्या काँग्रेस पक्षाला अनुकुल आहे. काँग्रेसला मानणारा मोठा वर्ग असून काँग्रेस हाच सक्षम पर्याय आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले म्हणाले. टिळक भवन येथे विधानसभा, लोकसभा २०१९ च्या निवडणुकीतील काँग्रेस पक्षाच्या पराभूत उमेदवारांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले बोलत होते.**



ते पुढे म्हणाले की, २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसचे जवळपास १४ ते १५ उमेदवार अत्यंत कमी मताने पराभूत झाले आहेत. आता आगामी निवडणुकी जास्तीत जास्त उमेदवार कसे निवडून येतील यासाठी आपला प्रयत्न असेल. राज्यात काँग्रेस एक नंबरचा पक्ष व्हावा यासाठी बुथ कमिट्या सक्षम करण्यावर भर द्या.

काँग्रेसचा विचार तळागाळापर्यंत पोहचवा, देशातील जनता भारतीय जनता पक्षाच्या कारभाराला कंटाळली आहे. शेतकरी आंदोलन करत असून त्यांच्याकडे सरकार लक्ष देत नाही, महागाई, बेरोजगारीची समस्या मोठी असून जनतेला भेडसावणाऱ्या या समस्यांकडे केंद्रातील भाजपाचे सरकार दुर्लक्ष करत आहे. केंद्रातील सरकार कोरोनाची परिस्थिती हाताळण्यातही सपशेल अपयशी ठरले आहे. केंद्र सरकारचे हे अपयश जनतेपर्यंत पोहचले पाहिजे. पक्ष संघटना बळकट करण्यावर भर द्या आणि समर्पण भावनेने काम केल्यास काँग्रेसची कामगिरी उज्ज्वल होईल, असे पटोले म्हणाले.

या बैठकीला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, चंद्रकांत हांडोरे, आ. कुणाल पाटील, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, संजय निरुपम, प्रदेश उपाध्यक्ष हुसेन दलवाई, मोहन जोशी, चारुलता टोकस, मधु चव्हाण, रमेश बागवे, वसंत पुरके, प्रदेश प्रवक्ते अतुल लोंढे व डॉ. सुधीर ढोणे आदी उपस्थित होते.

## मुरुडच्या काशिद समुद्रात बुडणाऱ्या पर्यटकाला जीवरक्षकाने वाचवले
### पोहायला उतरला असताना घडली दुर्घटना

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुरुडच्या काशिद समुद्रात बुडणाऱ्या एका पर्यटकाला किनाऱ्यावर तैनात असलेल्या जीवरक्षकामुळे जीवनदान मिळाले आहे. सलिम शेख असे बचावलेल्या पर्यटकाचे नाव आहे. समुद्राच्या पाण्यात बुडत असताना जीवरक्षक राकेश रक्ते यांनी त्याचा जीव वाचवला.

आज (२६ ऑगस्ट) सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सलिम शेख हा तरुण पर्यटक चिंचवड-पुणे येथून काशिदला फिरायला आला होता. काशिदच्या समुद्रात पाण्यात मनसोक्त पोहण्याचा आनंद घेत असतानाच, तो बुडायला लागला. ओहोटीच्या वेळी पाण्याचा अंदाज न आल्याने सलिम शेख समुद्राच्या पाण्याच्या दिशेने मागे ओढला गेला. ही बाब काशिद किनार्यावरील जीवरक्षक राकेश रक्ते यांच्या निदर्शनास आल्यानंतर, त्यांनी क्षणा-चाही विलंब न करता पाण्यात उडी घेतली. सलिम शेख यांच्यापर्यंत पोहत जाऊन, लाटांमध्ये गटांगळ्या खाणाऱ्या या पर्यटकाला सुखरुप किनाऱ्यावर आणले.



दरम्यान, जीवदान मिळाल्यानंतर सलिम शेख याने जीवरक्षक रक्ते यांचे आभार मानले. पोहताना मी मागे ओढला गेलो, किनाऱ्यापासून खूप दूरवर गेल्याने सगळे धुसर दिसत होते, मात्र जीवरक्षक रक्ते यांनी वेळीच येऊन मला जीवनदान दिले, अशी प्रतिक्रीया या पर्यटकाने व्यक्त केली.

## संक्षिप्त...
### महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची नवी कार्यकारिणी जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. उपाध्यक्ष, महासचिव, सचिव, प्रवक्ते यासह अनेक नवे पदाधिकारी या कार्यकारिणीत जाहीर करण्यात आले आहेत. उपाध्यक्षांच्या यादीत काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी डॉक्टर प्रज्ञा सातव समावेश आहे. त्यामुळे राजीव सातव यांच्या निधनानंतर त्यांचा राजकीय वारसा त्यांच्या पत्नी चालवतील हे स्पष्ट आहे.

शिस्तपालन कमिटीचे अध्यक्ष म्हणून पृथ्वीराज चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. महाविकास आघाडीचे सरकार स्थापन करण्यात पृथ्वीराज चव्हाण यांची महत्त्वाची भूमिका होती मात्र ना त्यांनी विधानसभा अध्यक्षपद स्वीकारलं ना मंत्रीपद.. काँग्रेस कार्यशैली बाबत सोनिया गांधींना पत्र लिहिणार्या २३ जणांच्या यादीत पृथ्वीराज चव्हाण यांचा समावेश होता. आता त्यांच्याकडे राज्यात शिस्तपालन कमिटीचं अध्यक्षपद देण्यात आला आहे. तर अमरजित मनहास यांच्याकडे खजिनदार पद देण्यात आलं आहे.

कार्यकारणी सोबतच १४ जिल्हाध्यक्षांच्या निवडीदेखील काँग्रेसने जाहीर केलेल्या आहेत. धवलसिंह मोहिते पाटील सोलापूर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष तर विक्रम सिंह सावंत सांगली ग्रामीणचे अध्यक्ष असणार आहेत. नव्या प्रदेश काँग्रेस कमिटीत जातींचं संतुलन प्रकर्षाने साधल्याची प्रतिक्रिया एका ज्येष्ठ नेत्याने दिली आहे.

## राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे.



राज्यस्तरीय मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेतील प्रथम क्रमांकास १० हजार रुपये, द्वितीय ०७ हजार, तृतीय क्रमांकास ०३ हजार रुपये, उतेजनार्थ एकूण ०२ पारितोषिके तर रायगड जिल्हास्तरीय अभिनय स्पर्धेतील प्रथम क्रमांकास ०५ हजार, द्वितीय ०३ हजार तर तृतीय क्रमांकास ०२ हजार रुपये, उतेजनार्थ एकूण ०२ पारितोषिके असणार आहेत. मराठी भाषेत हि स्पर्धा होणार असून १५ वर्षांवरील स्पर्धकाला या स्पर्धेत सहभाग घेता येणार आहे. स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये होणार असून प्राथमिक फेरी ऑनलाईन तर अंतिम फेरी ऑफलाईन स्वरुपात पनवेलमध्ये होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑडिशनचे व्हिडीओ ०७ सप्टेंबर २०२१ पर्यंत natyaparishad.panvelgmail.com या ईमेल पाठवावे. अधिक माहितीसाठी अमोल खेर(९८२०२३३३४९), किंवा गणेश जगताप (९८७०११६९६४) यांच्याशी संपर्क साधावा.स्पर्धेचे यंदा दुसरे वर्ष असून या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

## विकास प्राधिकरणचे ममदापुर नागरी भागातील रस्त्यांकडे दुर्लक्ष
### रस्त्यांची कामे मंजूर करण्याबाबत प्राधिकरण निरुत्साही

**दै.रायगड नगरी । कर्जत**

रायगड जिल्हा परिषदेने नियोजित विकास साधण्यासाठी नगरविकास विभागाच्या सुचनेने नेरळ ममदापुर संकुल विकास प्राधिकरण स्थापन झाले. मात्र आठ वर्षात या प्राधिकरण मधून ममदापूर नागरी भागातील रस्ते बनवले गेले आणि दरवर्षी प्रमाणे हे रस्ते पाण्यात हरवले आहेत. दरम्यान, येथील खड्डेमय रस्त्यामुळे फ्लॅट खरेदी करणारे ग्राहक यांची वाट बिकट झाल्याने बहुतेक रहिवासी ममदापूर मध्ये न राहणे पसंत केले आहे.




नेरळ ममदापुर विकास प्राधिकरण नेरळ,ममदापुर आणि कोल्हारे येथील नागरी भागातील विकासाचे नियोजन करणार होते.त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे कर येथील विकासक यांच्याकडून नेरळ ममदापुर संकुल प्राधिकरण गोळा करीत असते. मात्र २०13 पासून आतापर्यंत जेमतेम एक कोटी रुपयांचा निधी या भागातील विकास कामांवर खर्च करण्यात आला आहे. प्राधिकरणच्या ममदापुर हा परिसर पूर्ण नेरळ ग्रामपंचायतचा भाग होता. मात्र नेरळ ग्रामपंचायत मधून बाजूला गेल्यानंतर विकासापासून १० वर्षे बाजूला असलेल्या ममदापूर ग्रामपंचायत मधील भागाचा विकास प्रामुख्याने नेरळ ममदा-पुर संकुल प्राधिकरण स्थापन झाल्यानंतर मार्गावर आला. आता त्याच नागरी भागात तब्बल २०० इमारती उभ्या राहिल्या असून तीन गृह प्रकल्प देखील उभे राहिले आहेत. परंतु या भागात नेरळ ममदापुर संकुल प्राधिकरणकडून पायाभूत सुविधासाठी कोणताही निधी प्राधिकरण खर्च करीत नाही. त्यामुळे पायाभूत सुविधा उपलब्ध होत नसल्याने ममदापुर भाग हा नागरी भाग बाणण्याऐवजी समस्यांचे आगार बनले आहे. या नागरी भागातील चार किलोमीटर लांबीचे रस्ते एकदाही मजबूत पध्दतीने बनवले गेले नाहीत आणि त्यामुळे येथे घर खरेदी करून राहणारे लोकांचा प्रवास खड्ड्यातून सुरू आहे.

कर्जत-कल्याण राज्यमार्ग .../४

## सीसीआय जंबो कोविड सेंटर लवकरच महापालिकेच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संभाव्य तिसऱ्या कोरोना लाटेच्या पूर्वतयारीकरिता कळंबोली येथील भारतीय कपास निगमच्या (कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया) गोदामांमध्ये ६३५ खाटांचे जंबो कोविड सेंटर उभारले जात आहे. येत्या काही दिवसांमध्ये सिडको याचे हस्तांतरण पनवेल महानगरपालिकेकडे करणार आहे. या पार्श्वभूमीवरती बांधकाम, विद्युत, वैद्यकिय आरोग्य, पाणीपुरवठा,अग्निशमन विभागाने पहाणी करून रूग्णालय सुरू होण्याआधी योग्य ते नियोजन करण्याच्या सूचना आज झालेल्या बैठकीत आयुक्त गणेश देशमुख यांनी दिल्या.



या ६३५ जंबो कोविड सेंटरमध्ये ५०५ ऑक्सीजन खाटा, आयसीयू प्रौढांसाठी १०० खाटा, आयसीयू पिडियाट्रिक २५ खाटा, ट्रायएजसाठी ५ खाटा असणार आहेत. सध्या या रूग्णालयाचे काम शेवटच्या टप्प्यात आले असून विविध विभागात येत्या काही दिवसात सर्व रूग्णालयीन उपकरणे बसविण्यात येणार आहे. या दृष्टीने सुरक्षा रक्षकाची सोय येत्या दोन दिवसात केली जाणार आहे.

.../४

### मुख्यमंत्री यांचा राज्यातील अधिकाऱ्यांना मोठा दिलासा
## अधिकाऱ्यांचा सेवेत असतांना मृत्यू झाल्यास कुटुंबातील सदस्यास नोकरी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना फार मोठा दिलासा दिला आहे. सध्या शासकीय सेवेतील एखाद्या गट क किंवा गट ड कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्याला अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्यात येते. आज राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे की, गट अ आणि गट ब मधील अधिकाऱ्यांच्या बाबतीत देखील हे अनुकंपा धोरण लागू करावे.

कोविड परिस्थितीत अनेक अधिकाऱ्यांचे निधन झाले असून अधिकारी संघटनांची देखील हे अनुकंपा धोरण लागू करण्याची मागणी होती. मुख्यमंत्र्यांनी या मागणीप्रमाणे कार्यवाही करण्याची सूचना केली होती. त्या अनुषंगाने आज यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत आणण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील अधिकाऱ्यांच्या निधनामुळे ओढवणाऱ्या आर्थिक आ-पत्तीतून त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. गट अ किंवा गट ब मधील अधिकाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट क किंवा गट ड मध्ये अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात येईल. याशिवाय अनुकंपा नियुक्तीसाठीचे विविध आदेश एकत्रित करून महाराष्ट्र राज्य शासन अनुकंपा नियुक्ती नियम २०२१ तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे, यामुळे अनुकंपा संदर्भातील प्रशासकीय अडचणी दूर होतील.

## मुंबईतील सेंट जोसेफ बॉर्डिंग स्कूलमधल्या २२ जण कोरोना पॉझिटिव्ह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील आग्रीपाडा येथे असणाऱ्या जोसेफ अनाथ आश्रममध्ये राहणाऱ्या १५ मुलांसह २२ जणांना कोरोनाची लागण झाली आहे. यातील ४ मुलं १२ वर्षापेक्षा कमी वय आहे. ज्यांना मुंबईच्या नायर हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केलं आहे. तर १२ वर्षापेक्षा अधिक वय असलेल्यांना रिचर्ड्सन अँन्ड क्रूडस हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

अनाथ आश्रममध्ये कोरोना तपासणीसाठी शिबीर आयोजित करण्यात आलं होतं. त्यावेळी ९५ लोकांची कोरोना चाचणी करण्यात आली. त्यात २२ जण कोरोना पॉझिटिव्ह आढळले. हॉस्पिटलमध्ये दाखल केलेल्या मुलांमध्ये कोरोनाची सौम्य लक्षणं आहेत अशी माहिती नायर हॉस्पिटलचे डीन डॉ. रमेश भारमल यांनी सांगितले. मिळालेल्या माहितीनुसार, २२ लोकांपैकी ११ जण असे आहेत की, ज्यांचे वय १२ ते १८ वयोगटातील आहेत. या सर्वांना रिचर्ड्सन एँड क्रूड्स हॉस्पिटलमध्ये शिफ्ट करण्यात आले. त्याशिवाय ७ वयस्क लोकांनाही याच हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले आहे. बीएमसीने खबरदारी म्हणून या इमारतीला सील केले आहे.

## उरण तालुक्यात श्रीकृष्ण जन्माष्टमी सप्ताहाचा हिरकमहोत्सव

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील पुनाडे गावात श्रीकृष्ण जन्माष्टमी सप्ताहाचा हिरकमहोत्सव मोठ्या भक्तीभावाने व जल्लोषात साजरा होत आहे. आजूबाजूला औद्योगिकरणाचा वेढा पडूनही डोंगराच्या कुशीत लपलेल्या व खाडीकिनारी वसलेल्या उरण तालुक्यातील पुनाडे गावाने १९६१ पासून गेली ६० वर्षे श्रीकृष्ण जन्माष्टमी सप्ताहाची अनोखी परंपरा जोपासली आहे. नारळी पौर्णिमा झाल्यावर श्रावण वद्य प्रतिपदेपासून ह्या सप्ताहाला प्रारंभ होतो.



श्रीकृष्ण जन्माष्टमीला या सप्ताहाची सांगता होते. ह्या सप्ताहात गावातील हनुमान मंदिरात विधीवतपणे कलश स्थापना करुन २४ तास अखंडपणे नंदादीप तेवत ठेवून नामस्मरण व भजन - पूजन केले जाते. गावातील बुजुर्ग मंडळींनी सुरु केलेली ही परंपरा नवीन पिढीनेही तितक्याच भक्तीभावाने जोपासली आहे. गावातील दिवंगत पांगा ( पांडूरंग ) धाया पाटील यांच्या प्रेरणेतून हा सप्ताह १९६१ साली सुरु झाला.

याबाबत असे सांगितले जाते की १९६१ साली गावातील तुकाराम नारायण पाटील यांच्या आगारातील शेतात आवटणी ( भाताची लावणी ) करत असतांना पुनाडे ग्रामस्थांनी हा सप्ताह साजरा करण्याचा मनोदय व्यक्त केला. सुरुवातीस ह्या उत्सवासाठी शेजारच्या वशेणी गावातील रामदास धोंडू पाटील व राघो महादू ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले. विशेष उल्लेखनीय

.../४

# निर्मल गणेशोत्सव स्पर्धेत नागरिक, सामाजिक संस्था, गणेशोत्सव मंडळांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे : डॉ.किरण पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

गणेशोत्सवात सामाजिक जाणीव जागृतीची व प्रबोधनाची श्रेष्ठ परंपरा पुढे नेण्याच्या दृष्टीने कोविड काळात नियम पाळून सामाजिक भावनेने रायगड जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागामार्फत निर्मल गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन दि.९ सप्टेंबर २०२१ ते २१ सप्टेंबर २०२१ या कालावधीत करण्यात आले आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध गणेशोत्सव मंडळे,सामाजिक संस्था तसेच वैयक्तिक स्तरांवरील नागरिकांनी मोठया प्रमाणवर सहभाग घ्यावा,असे आवाहन जिल्हा परिषेदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.

या स्पर्धेचा उद्देश हा पर्यावरण रक्षण ,निसर्ग संवर्धन , परिसर स्वच्छता व आरोग्याप्रती चांगल्या सवयी लावून गावपातळीवर जास्तीत जास्त लोकसहभाग घेऊन निर्मल वातावरणात पर्यावरणस्नेही गणेशोत्सव साजरा करणे, हा आहे. या स्पर्धेमध्ये स्पर्धकांनी सहभाग घेण्याकरिता http://bit.ly/raigadganesh या गुगल लिंकवर दि.२१ सप्टेंबर २०२१ पर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता सर्व स्पर्धकांनी नियम व अटींच्या अधीन राहून ऑनलाईन नोंदणी करावी.

या स्पर्धेकरिता पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती बसविणाऱ्या सार्वजनिक मंडळे,विविध सामाजिक संस्था तसेच मंडळाचा गणपती नसल्यास गावात घरगुती पातळीवरील गणपती उत्सवात सहभागी होऊन या स्पर्धेत मंडळे सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेत सहभागाकरिता गणेश पूजनाचे दैनंदिन निर्माल्य गोळा करून ते निर्माल्य कलश, पोते, गोणी यात संकलन करावे व त्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी कंपोस्टिंगसाठी पाठविणे/सेंद्रीय खत यासाठी वापरणे, गणपतींच्या सजावटीसाठी वापरण्यात येणारे आरास,मखर,पूजेतील प्लास्टिक वेस्टन असलेले साहित्य गोळा करून ग्रामपंचायतीच्या संकलन केंद्रात जमा करणे, पर्यावरण पूरक शाडूच्या मूर्तीचा वापर, मूर्ती विर्सजनाकरिता बनविलेल्या कृत्रिम तलावाचा वापर इत्यादी पर्यावरणपूरक विविध जनजागृतीपर उपक्रम स्लोगन, पोस्टर, बॅनर, जिंगल्स, व्हिडिओ,भजन यांच्या माध्यमातून राबवावयाचे आहेत.

संपूर्ण जिल्हयातून प्रथम,व्दितीय व तृतीय असे तीन क्रमांक व दोन उत्तेजनार्थ क्रमांक जिल्हा स्तरावरून निवडून त्यांना बक्षीस म्हणून रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.तसेच सहभागी स्पर्धकांना ई-प्रमाणपत्र देण्यात येईल.

तरी रायगड जिल्ह्यातील गणेशोत्सव मंडळे,सामाजिक संस्था तसेच वैयक्तिक स्तरावरील नागरिकांनी निर्मल गणेशोत्सव स्पर्धेत मोठया संख्येने सहभागी होऊन आपला गणेशोत्सव पर्यावरणपूरक होण्यास हातभार लावावा, असे आवाहन पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे यांनी केले आहे.

# सरपटणारे प्राणी आलेत लोकवस्त्यांमध्ये

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

२२ जुलै २०२१ रोजी सलग तीन दिवस झालेल्या अतिवृष्टीमुळे पोलादपूर तालुक्यातील ढवळी, कामथी, घोडवनी, चोळई आणि सावित्री या नद्यांची पात्रं तुडूंब भरून लोकवस्ती आणि शेतजमिनींमधून वाहू लागली आणि या नद्यांजवळील सरपटणाऱ्या प्राण्यांचा अधिवासही पुर्णपणे वाहून गेल्याने सरपटणारे प्राणी लोकवस्त्यांच्या आश्रयाला आल्याचे दिसून आले आहे.

पोलादपूर शहरातील सिध्देश्वर आळीमधील स्विकृत नगरसेवक राजन पाटणकर यांच्या घरापासून काही अंतरावर उत्तरवाहिनी सावित्री नदी असून चोळई नदीचे अतिवृष्टीदरम्यान तयार होणारे पात्र काही फुट अंतरावर आहे. सोमवारी रात्री या घरालगतच्या एका झाडावर अजगर चढले असताना खाली काँक्रीटच्या रस्त्यावर कोसळल्याचा आवाज आला. यावेळी तब्बल एक पाच ते साडेसहा फूट लांबीचे अजगर आढळून आल्याने दिनेश दरेकर, स्वप्नील वंडकर, वैभव वंडकर, गणेश येरूणकर, विकी सागवेकर आदी सर्पमित्रांनी अजगराला काळजीपूर्वक पकडून पिशवीमधून महाबळेश्वर रस्त्यावर आंबेनळी घाटामध्ये रात्रीच सोडले.

# ग्रामपंचायत चरईखुर्द येथे कृषी दिन साजरा



**दै.रायगड नगरी । तळा**

पद्मश्री व्हि.के.पाटील यांच्या जयंतीनिमित्त कृषि दिन ग्रुप ग्रामपंचायत-चरईखुर्द येथे तालूका कृषि अधिकारीसागर वाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पाटील जनार्दन अंबार्ले यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, सरपंच सौ.सविता विठोबा शिंदे (सरपंच-ग्रामपंचायत-चरईखुर्द) यांचे हस्ते श्रीफळ वाढवून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

सदस्य चंद्रकांत अंबार्ले, यशवंत गोळे, सुधाकांत मंडलिक, प्रकाश कांबळे, प्रकाश कुलकर्णी (गुरूजी), चंद्रकांत सावंत, अजित पवार, दिपाली अंबार्ले ह्या कार्यक्रमाला शेतकरी वर्ग हजर होते. कार्यक्रमाला एस.आर.म्हात्रे (कृषि पर्यवेक्षक), यांनी डॉ.व्ही.के पाटील यांच्या विषयी माहिति सांगितली. त्याचबरोबर कृषि योजना विषयी माहिती दिली. भाग्यश्री मराठे (कृषि सहाय्यक-बेलघर) यांनी डॉ.व्हिके पाटील यांच्या जिवन शैली विषयी माहीती दिली. तर प्रकाश कुलकर्णी (गुरूजी) यांनी डॉ.व्ही.के पाटील यांच्या विषयी तर जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सखोल असे विशेष मार्गदर्शन केले. शेवटी कार्यक्रमाचे आभार श्रीम.भाग्यश्री मराठे (कृषि सहाय्यक) बेलघर यांनी मानले व कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

# मजगांव स्मशानभूमीच्या दुरावस्थेला जबाबदार कोण ?

## तातडीने दुरुस्ती न झाल्यास मनसेचा निवेदनाद्वारे आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मागील वर्षी झालेल्या निसर्ग चक्रिवादळात मुरुड तालुक्यातील मजगांव येथील स्मशानभूमीची पार दुरावस्था झालेली असून बांधकाम व छताचे नुकसान झाले असून सव्वा वर्ष होऊनही दुरावस्थेकडे बघून ढिम्म प्रशासन की निगरगट्ट सुस्त सत्ताधारी ? असा सवाल ग्रामस्थांतून उठत असून हे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे.याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष शैलेश खोत,माजी अध्यक्ष अरविंद गायकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा अध्यक्ष राहुल गोसावी, विभाग अध्यक्ष गजानन भोईर व शाखा उपाध्यक्ष शुभम पुगावकर यांनी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांना एक निवेदन सादर करण्यात आले असून वेळप्रसंगी आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, निसर्ग चक्रिवादळानंतर ब-याच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.यात सार्वजनिक मालमत्तेचे खूप नुकसान झाले असून ते अद्याप दुरुस्त करण्यात आले नाही.अंत्यविधिस अत्यावश्यक असलेली मजगांव स्मशानभूमीची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे.तेथील पत्रे (छत) आणि बांधकाम उध्वस्त झाले आहे.यामुळे अंत्यविधी करण्यात अनेक अडचणी येत आहेत.मानवी देहाच्या अंतवेळीस अतिशय भावनिक आणि वेदनादायक वातावरण असते.अशातच ह्या अवस्थेत त्या देहास निरोप देण्यासाठी येणा-या प्रत्येक मनुष्याला स्मशानभूमीच्या या दुरावस्थेचा त्रास सहन करावा लागतो.स्मशानभूमीच्या दुरावस्थेमुळे अंत्यविधी करणे खूप त्रासदायक ठरते.कोरोना महामारी, निसर्ग चक्रिवादळ व पावसामुळे येथील समाज बांधवांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मजगांव स्मशानभूमीच्या दुरावस्थेमुळे होणारा त्रास लक्षात घेऊन तातडीने दुरुस्ती करण्यात यावी अन्यथा या विरोधात नाईलाजाने जन आंदोलन करावे लागेल. असे मनसेच्या वतीने विभाग अध्यक्ष गजानन भोईर व शाखा उपाध्यक्ष शुभम पुगावकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

---

श्री.इंदलकर साहेब यांचे कोर्टात

ॲड.राठोड व्ही.पी.

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात

क्रि.एम.ए.नं.७५५/२०२१
ने.ता.२२/१०/२०२१

श्री.अविनाश अरविंद गांधी
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : धंदा
रा.बदलापूर, ता.अंबरनाथ, जि.ठाणे — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत वाकडी, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची आजी कै.सुशिला केशव गांधी यांचा दि.१७/०३/२०२० रोजी राजीव रंजन आधारघर, कुष्ठरोग निवारण समिती, शांतीवन, पोस्ट नेरे, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्या मयत झाले आहेत. परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद पंचायत समिती कार्यालय पनवेल व ग्रामपंचायत सदरी नसल्याने संबंधित ग्रामपंचायत वाकडी यांनी तसा दाखला अर्जदार यांस दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये मयत सुशिला केशव गांधी यांचा मृत्यू दि.१७/०३/२०२० रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब पनवेल यांचे कोर्टात सदरचा चौकशी अर्ज दाखल केला असून त्यांच्या मृत्यू नोंदणीबाबत कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष हरकती घेतल्या गेल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची लागलीच कारवाई करेल आणि ते जर अर्जदार यांची आजी कै.सुशिला केशव गांधी यांचा मृत्यूचा दाखला घेण्यास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांच्या मृत्यूच्या नोंदणीचा अर्ज मंजूर करेल याची दखल घ्यावी.

पनवेल
दि.२६/०८/२०२१

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोटाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

---

मा.पांडे साहेब यांचे कोर्टात

ॲड.शेखर खोपकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात

क्रि.चौ.अर्ज क्र.८५८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०९/२०२१

श्री.लक्ष्मण अर्जुन कडू
वय : ७० वर्षे, धंदा : शेती
रा.चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक ग्रामपंचायत चिंध्रण,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील अर्जुन गोविंद कडू हे दि.१५/०३/१९७८ रोजी मौजे : चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तथापि अनावधानाने मयत अर्जुन गोविंद कडू यांच्या मृत्यू घटनेची नोंद विहित मुदतीत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील अर्ज अर्जदार यांनी मयत अर्जुन गोविंद कडू यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता सदरचा अर्ज मे.न्यायालयात दाखल केला आहे.

सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, हे सर्व कळावे.

ही नोटीस आज रोजी दि.२५/०८/२०२१ माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोटाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

---

ॲड.शुभांगी पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.ज्युडी मॅजि. सो., पनवेल यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्रं.४९४/२०२१
ने.ता.२९/०९/२०२१

श्री.संदेश हरी सकपाळ
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.घोटकॅम्प, कोयनावेळे,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.हरी गंगाराम सकपाळ हे दि.१८/०८/२०१७ रोजी मौजे : घोटकॅम्प, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झालेले आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेले आहे. सबब कारणे सदरचे अर्जदार यांचे वडील कै.हरी गंगाराम सकपाळ हे दि.१८/०८/२०१७ रोजी त्यांच्या मृत्यू नोंदणी करण्याचे आदेश पनवेल महानगरपालिका व पनवेल पंचायत समिती / तहसील पनवेल यांना देण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब सदर फौजदारी चौकशी अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद करून मिळण्याकरिता अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर मृत्यूच्या नोंदीच्या अर्जाचा आदेश मिळण्याकरिता कोणाच्याही, कसल्याही व कोणत्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांच्या लाभांत मृत्यूच्या नोंदीचा आदेश दिला जाईल.

आज दि.२६/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोटाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल नामे श्री.समाधान मोहन मोरे, पत्ता : सदनिका क्रं.३०४, अनिरुद्ध अर्पन, भूखंड क्रं.९२, सेक्टर २०, उलवे, नवी मुंबई-४१०२०६, यांनी खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकतीबाबत श्री.शिवदास दत्तात्रय घरत, रा.पत्ता : मुं.वरचे ओ-वळे, पोस्ट पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड पिन कोड ४१०२०६ यांचे बरोबर दि.२६/०८/२०२१ रोजी परस्पर सामंजस्याचा करारनामा (MOU) केलेला असून त्रिपक्षीय कारनाम्याने सदर भूखंड हस्तांतरीत करीत आहेत.

तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, वारस हितसंबंध, गहाण, ताबा, दान, बक्षिस, पोटगी, विक्री, विश्वस्त, कुळ, वहिवाट, ॲटॅचमेंट इ. अगर अन्य कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे दिलेल्या पत्यावर समक्ष येवून भेटावे. जर अशी लेखी खबर अथवा हरकत सदर मुदतीत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाही अगर तसा असल्यास त्याने सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूरा करतील हे सर्वांस कळावे व त्यानंतर येणाऱ्या हरतींचा विचार केला जाणार नाही व त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : वरचे ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमी संपादन क्रमांक | सर्व्हेक्षणानुसार बांधकाम क्रमांक / सर्व्हे नं. | गावाचे नाव | क्षेत्रफळ | प्लॉट नं. | सेक्टर | स्थळ |
|---|---|---|---|---|---|---|
| OWALE-138 | VO-312 40/5+8 | गाव वरचे ओवळे तालुका पनवेल | ६० चौ.मी. | २६२ A | १ | पुष्पक नगर वडघर, ता.पनवेल, जि.रायगड |

दि.२६/०८/२०२१
नवी मुंबई

**सही/-**
**ॲड.देवेंद्र भिका पाटील**
**शॉप नं.१, श्रीजी सोहम, सी.एच.एस.लि., भूखंड क्रं.७६, सेक्टर २१, उलवे, नवी मुंबई-४१०२०६**

---

राव साहेब

ॲड.संगम प्रकाश सावंत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१०८३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०९/२०२१

१) श्री.प्रमोद रामचंद्र घारे
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्रीमती.शारदा रामचंद्र घारे
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्री.अजित रामचंद्र घारे
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.अमित रामचंद्र घारे
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.शांतीकुंज को.ऑ.हौ.सोसा.लि.,
रुम नं.ई-३०३, प्लॉट नं.१४ डी,
सेक्टर ४, खारघर, नवी मुंबई ४१०२१० — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांचे वडील कै.रामचंद्र मारुती घारे हे दि.१४/०९/२०१८ रोजी राहत्या घरी मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार यांची आई कै.हौसाबाई मारुती घारे ह्या दि.०४/०९/२००६ रोजी घारेवाडी, ता.कराड, जि.सातारा येथे मयत झाली आहे.

कै.रामचंद्र मारुती घारे यांचे नांवे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**शांतीकुंज को.ऑ.हौ.सोसा.लि., रुम नं.ई-३०३, प्लॉट नं.१४ डी, सेक्टर ४, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**

येणेप्रमाणे वर वर्णन केलेल्या मिळकतींच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार कै.रामचंद्र मारुती घारे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.रामचंद्र मारुती घारे यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२५/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोटाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

Rao Saheb

Adv.Sanjay K. Kanade
Adv. Anil R Nagdeve
Adv. Gaurav S. Kanade

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE
SENIOR DIVISION. PANVEL, AT PANVEL

CIVIL MISC. APPL 1051/2021
Exh. 8/D
Next Date : 6/10/2021

I) Mrs. Rachna Madan Thakkar
Age - 34 Yrs. Occupation - Service
2) Miss. Nehal Madan Thakkar
Age- 31 Yrs. Occupation - Service
Sudha Manjiri, B Wing. Plot No.4,
Tilak Road, Near Om Bakery Port
Panvel, Tal-Panvel, Dist-Raigad — Applicants

Let it be known to all concerned that deceased Late Mrs. Nalini Madan Thakkar on 15/01/2018. Therefore the applicant has filed the Misc. Application No.1051/2021, Application for Heirship Certificate Under the Provisions of Bombay Regulation Act Vlll of 1827.

**THE SCHEDULE OF THE IMMOVABLE PROPERTY**

1) Flat No.308, Third Floor, Sai Samarth Blessing Building city Survey No. 1142+ 1143 Panvel, Tal - Panvel. Dist. Raigad.
Area : 30.43 sq.mtr. Carpet Area &. 5.57 sq.mtr. Flower Bed
Agreement for sale : dated 03/08/2012, bearing document No. Panvel 9553/2012. 50% share

2) Shop no. 02. Ground floor, Sai Vihar CHS Ltd. Survey No. 483, 484, Panvel, Tal-Panvel, Dist-Raigad.
Area: 195 sq.ft. Carpet Area
Agreement for Sale : Dated 25/06/2010, bearing Document No.P1- 7845/2010. 50% share

3) Shop no. 35, Ground Floor Agarwal Bhantiya Complex-1, Plot No.197, Panvel, Tal-Panvel, Dist-Raigad.
Area : 214 sq.ft
Agreement for sale : dated 03/09/1993 bearing Document no.1257/1993. 100% share

4) Flat No. 4. B wing. First Floor. Sudha Manotry CHS Ltd. CTS No. 646 A, 647 A, 646 B, 647 B. Tilak Road Panvel.
Area : 605 sq.ft. Built-up
Agreement dated 21/07/1989 Document No. 1127/1989. 100% share

5) Shop No. 1, Ground Floor. N.M.Thakkar Road. Final Plot No. 278 &. 278/1. Panvel, Tal - Panvel, Dist - Raigad,
Area : 323 sq.ft Built-up
Gift deed: Dated 28/01/2009 Document No. 511/2009. 50% share

If any person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said share property, which is more particularly, described in the schedule hereinabove, is hereby invited, then they may appear in person or through their Advocate, objecting this application in the Court of Civil Judge Sr. Division at Panvel, Dist. Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary order thereon which please note.

Date : 26/08/2021
Palce : Panvel

**Sd/- Jr.Clerk Civil Court, S.D.Panvel** — Court Seal — **Sd/- Asst.Suprierdendent. Civil Court, S.D.Panvel**

---

पृष्ठ क्र.१ वरुन...

## विकास प्राधिकरणचे ममदापुर नागरी भागातील रस्त्यांकडे दुर्लक्ष

रस्त्यावरून ममदापुर गावात जाणारा रस्ता जेथून सुरू होतो तेथूनच खड्ड्यातून प्रवास सुरु होतो.रायगड जिल्हा परिषद मालकीच्या नेरळ जुने पोस्ट ऑफिस ते ममदापुर आणि पुढे भडवळ या रस्त्याचे डांबरीकरण अनेक वर्षे झाले नाही.नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील रस्ता वगळता ममदापुर ग्रामपंचायत मधील मुख्य रस्ता नव्याने तयार होण्याच्या प्रतीक्षेत आहे.त्यावेळी नागरी भागातील दोन मुख्य रस्ते हे देखील खड्ड्यात आहेत. नेरळ- ममदपूर रस्त्याने नागरी भागात जाणारा ४० फुटाचा रस्ता असून हा रस्ता आखाडावाडी पर्यत असलेल्या दिलकॅप कॉलेज पर्यन्त जातो.त्याचवेळी ममदापुर गावातील वस्तीला लागून असलेल्या ४० फूट रस्त्याची अवस्था खड्ड्यात गेलेल्या रस्त्यासारखी आहे. तर अंतर्गत दोन रस्ते वगळता सर्व रस्ते हे पावसाच्या पाण्यात हरवले आहेत. हे सर्व रस्ते नगररचना विभागाने तयार केलेल्या नियोजित भागातील रस्ते आहेत. त्यामुळे नागरी भागातील रस्ते सिमेंट काँक्रीटचे बनवले गेले नाहीत आणि त्यामुळे हे रस्ते खड्ड्यात हरवले आहेत. ममदापुर नागरी भागातील रस्त्यांबाबत नेरळ ममदापूर संकुल प्राधिकरण आणि रायगड जिल्हा परिषद कडून कोणताही निधी खर्च केला जात नाही. परिणामी रस्त्यांअभावी येथे घर खरेदी करून राहणारे यांचा प्रवास खड्ड्यातून सुरू आहे,त्यामुळे अनेक रहिवासी घर सोडून आपल्या शहरात असलेल्या घरी राहायला गेले आहेत.

## सीसीआय जंबो कोविड सेंटर लवकरच महापालिकेच्या ताब्यात

येत्या सप्टेंबरच्या महिन्याच्या सुरूवातीला हे जंबो कोविड सेंटर सुरू करण्याच्या दृष्टीने महापालिका युध्द पातळीवर प्रयत्न करत आहे. जेवण, औषधे तसेच संबधित घटकांच्या निविदा जाहीर करण्यात आल्या आहेत. येत्या काही दिवसात याची पुर्तता केली जाणार आहे.

कोरोनाची तिसरी लाट आल्यास पनवेल पालिका क्षेत्रासह रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणाहून रूग्ण याठिकाणी उपचारास येण्याची शक्यता असल्याने कळंबोली येथील भारतीय कापूस निगम येथील जंबो कोविड सेंटर महत्वाचे ठरणार आहे. पालिकेतील संबधित विभागांनी या रूग्णालयांवर लक्ष केंद्रित करून लवकरात लवकर राहीलेली कामे पूर्ण करून घ्यावीत, असे आदेश आयुक्तांनी आज झालेल्या बैठकित दिले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर,उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त धैर्यशील जाधव, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अधिकारी संजय कटेकर, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, संबधित अधिकारी उपस्थित होते.

## उरण तालुक्यात श्रीकृष्ण जन्माष्टमी सप्ताहाचा हिरकमहोत्सव

बाब म्हणजे ह्या सप्ताहासाठी संपूर्ण श्रावण महिन्यात पुनाडे गावात मांसाहारबंदी व दारुबंदी केली जाते.

गेली ६० वर्षे मोठ्या जल्लोषात, उत्साहात व आनंदात साजरा होत असलेल्या ह्या श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या सप्ताहामुळे गावात एकोपा व शांतता नांदत आहे. हेच तर ह्या हिरकमहोत्सवी श्रीकृष्णजन्माष्टमी सप्ताहाचे खरे फलित आहे. आदर्श गावाची जडणघडण करणा-या पुनाडे गावातील हिरकमहोत्सवी सप्ताहाची दखल शासनाने घ्यावी अशी अपेक्षा पुनाडे ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# माथेरानमध्ये नगरपरिषदेच्या निवडणुकीचे पडघम लागले वाजू

## शिवसेना आणि काँग्रेस पक्षाची सोशल मीडियावर खडाजंगी सुरू

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान जरी थंड हवेचे ठिकाण म्हणून जगप्रसिध्द असले तरीसुद्धा या इवल्याशा गावातील राजकीय वातावरण हळूहळू गरम होऊ लागले आहे. नगरपरिषदेची आगामी निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपलेली असल्यामुळे आजपर्यंत नेहमीच विरोधी पक्षाची भूमिका बजावणाऱ्या राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने यावेळी नगरपरिषदेत काँग्रेसची सत्ता स्थापन व्हावी यासाठी पुरेपूर प्रयत्न सुरू केले आहेत. तर मागील वर्षी काँग्रेसचे शहर अध्यक्ष,माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी आगामी निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी दर्शवली आहे. निवडणुका समीप आलेल्या असल्याने सत्ताधारी शिवसेनेने आपल्या कार्यकाळात जी काही विकास कामे केली आहेत आणि जे काही गावाच्या विकास कामांबाबत निर्णय घेतले आहेत त्यावर काँग्रेस पक्षाने आक्षेप घेतले आहेत काँग्रेसचे नगरसेवक शिवाजी शिंदे यांनी सत्ताधारी गटावर फेसबुकच्या माध्यमातून आपली विडिओ क्लिप टाकून खडाडून टीकास्त्र सोडले आहे.

तर काँग्रेस पक्षाला सुध्दा शिवसेनेचे गटनेते प्रसाद सावंत यांनी सुध्दा आपली बाजू भक्कमपणे मांडून जशाच तसे प्रति उत्तर दिले आहे. काँग्रेस पक्षाने केलेल्या आरोपांचे खंडन प्रसाद सावंत यांनी आपल्या ब्रह्मास्त्राने चोखपणे दिलेले आहे. शिवसेना सत्तेत आल्यापासून सुरुवातीची दोन वर्षे तत्कालीन मुख्याधिकारी सागर घोलप यांच्या नकारात्मक कार्यपद्धती मुळे कोणत्याही प्रकारची विकास कामे पूर्ण होऊ शकली नाहीत. त्यानंतर २०१८ च्या शेवटच्या क्षणी कार्यशील मुख्याधिकारी म्हणून रामदास कोकरे यांनी पदभार स्वीकारला होता त्यावेळेस अनेक महत्वपूर्ण कामे मार्गी लावण्यासाठी मोठया प्रमाणात मदत झाली होती. शिवसेना सत्तेत विराजमान झाल्यापासून जेमतेम दीड ते दोन वर्षाचाच कालावधी कामे करण्यासाठी प्राप्त झाला आणि त्यातूनच जी काही महत्वाकांक्षी कामे पूर्ण झाली आहेत त्यावेळेस सहसा कुणीही विरोध दर्शविला नाही. सर्वपक्षीय मंडळी अगदी गुण्यागोविंदाने एकमेकांना सहकार्याची भूमिका बजावत होते परंतु आगामी निवडणुकीचे वारे वाहू लागल्यामुळे शेवटी पुढील सत्तेत विराजमान होण्यासाठी काँग्रेस पक्षाने आपली विरोधाची जबाबदारी स्वीकारली असून नगरसेवक शिवाजी शिंदे यांनीच बहुतेक



वेळेस सत्ताधारी गटाच्या कामांस,निर्णयास विरोध दर्शविला आहे.तर सत्ताधारी गटाचे गटनेते प्रसाद सावंत यांनी विकास कामे पूर्ण करतांना अन्य पक्षाच्या कार्यकर्त्यांना सुध्दा विविध कामांत सामावून घेतले आहे अगदी निपक्षपणे ते आपली जबाबदारी पार पाडत आहेत परंतु शेवटी काही केल्यास राजकारणात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकमेकांची उणिधुनी काढणे हे स्वाभाविक आहे. असे जरी असले तरी सुद्धा सोशल मीडियावर फेसबुकवर यापुढेही अशाचप्रकारे एकमेकांना आव्हाने आणि त्याला प्रतिउत्तरे दिली जाण्याची शक्यता आहे. माथेरान हे अगदी छोटेसे गाव असुन पर्यटनस्थळ असल्याने इथे १९०७ साली नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे. जेमतेम तीन हजारांच्या आसपास मतदार संख्या असून एकूण सतरा प्रभाग आ-हेत. आगामी निवडणुकीत स्वतंत्र वार्ड रचना असल्यामुळे उमेदवारांना एक एक मत लाख मोलाचे बनले आहे त्यासाठी आतापासूनच राजकीय व्युव्हरचना करण्यासाठी शिवसेना आणि काँग्रेस पक्षाने सुरुवात केली आहे.पक्षप्रवेश तसेच नागरिकांना भेडसावत असलेल्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी सुरुवात झाली आहे येणाऱ्या निवडणुकीत खरी लढत ही काँग्रेस आणि शिवसेना याच दोन पक्षात होणार असून अन्य पक्ष याच दोन पक्षाच्या नेतृत्वाखाली अथवा आघाडी युती करून आपले नशीब अजमावतील अशीच चर्चा सुरू आहे.

# दुषित पाण्याबाबत शिवसेनेने विचारला सिडको अधिकाऱ्यांना जाब

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहतीमध्ये येत असलेल्या दुषित पाण्याबाबत सिडकोच्या संबंधित विभागाकडे जावून तेथील अधिकाऱ्यांना शिवसेनेने जाब विचारला आहे.

जिल्हा प्रमुख शिरीष घरत व महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली आणि विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर व डी एन मिश्रा कळंबोली शहर प्रमुख यांच्या मार्गदर्शनाने कळंबोली वसाहतीत सेक्टर १ मधील अ ब क ड या विभागात सांडपाणी पिण्याचे पाणी लाईन मधून येत असल्याने रहिवासी त्रस्त झाले आहेत. त्या अनुषंगाने सिडको अधिकारी देवरे पाणी पुरवठा विभाग अधिकारी यांची भेट कळंबोली शिवसेना शहर पदाधिकारी सूर्यकांत म्हसकर आणि अक्षय साळुंखे यांनी स्थानिक रहिवाशांच्या साथीने घेवून याबाबत जाब विच-ारला तसेच जीवनावश्यक असलेल्या पाणी समस्येवर तोडगा काढण्याची मागणी केली आहे. त्यानुसार देवरे यांनी लवकरच सुरळीत पाणी पुरवठा व स्वच्छ पाणी पुरवठा होईल याकडे लक्ष घालून उपाय योजना करतो असे आश्वासन दिले.

# मोटारसायकल स्लिप होऊन चालकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आदई सर्कल येथून नवीन पनवेल सेक्टर-६ च्या दिशेने जाणाऱ्या सागर विजय ठोंबरे (३१) याची मोटारसायकल स्लिप झाल्याने तो फुटपाथवर असलेल्या इलेक्ट्रीक बॉक्सवर धडकुन मृत झाल्याची घटना आदई तलावाजवळ घडली.

या घटनेतील मृत सागर ठोंबरे हा नवीन पनवेल सेक्टर-६ मध्ये कुटुंबासह रहाण्यास होता. सागर आपल्या व्यवसायासाठी मोटारसायकलचा वापर करत होता.

सागर आपल्या मोटारसायकलवरुन आदई सर्कल जवळून नवीन पनवेल सेक्टर- ६ येथील आपल्या घरी जात होता. त्याची मोटारसायकल आदई तल-ावाजवळ सेक्टर-९ भागात आली असताना, भरधाव वेगात असलेली त्याची मोटारसायकल स्लिप झाली. त्यामुळे सागर फुटपाथवर असलेल्या इलेक्ट्रीक बॉक्सवर जोरदार आदळला. यात सागरच्या डोक्याला दुखापत झाल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यामुळे त्याला पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले. सागर ठोंबरे याने भरधाव वेगात निष्काळजीपणे मोटार सायकल चालविल्यामुळे त्याची मोटारसायकल स्लिप होऊन त्यात त्याचा मृत्यू झाल्याचे आढळुन आले. त्यामुळे खांदेश्वर पोलिसांनी या अपघाताला सागर ठोंबरे याला जबाबदार धरुन त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

---

अॅड.मनोज भुजबळ
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१११७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०७/१०/२०२१

१) श्रीमती.सुनंदा अशोक भुजबळ
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रशांत अशोक भुजबळ
वय : ३८ वर्षे, धंदा : वकील
नं.१ व २ रा.विठाई बंगला, भुजबळवाडी,
पोदी नं.२, सेक्टर नं.१५-ए, नवीन पनवेल, जि.रायगड
३) सौ.प्रज्ञा शिवराज बोरावके
वय : ३३ वर्षे, धंदा : डॉक्टर
रा.ऐश्वर्या आंगण, चाकण, ता.खेड, जि.पुणे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. अशोक कृष्णाजी भुजबळ ह्यांचे निधन दि.२५/०७/२०२० रोजी झाले आहे. कै.अशोक कृष्णाजी भुजबळ यांची आई कै.सिंधु कृष्णाजी भुजबळ यांचे निधन दि.०९/०२/२००७ रोजी झालेले आहे. कै.अशोक कृष्णाजी भुजबळ यांचे वडील कै.कृष्णाजी विठ्ठल भुजबळ यांचे दि.१५/०८/२००८ रोजी निधन झालेले असल्याने श्रीमती.सुनंदा अशोक भुजबळ वगैरे ह्यांनी कै. अशोक कृष्णाजी भुजबळ यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतींचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

| गावाचे नाव | यु.के.नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | ६९ | २८६ | बी | १-८४-८५ | २२.८७ |
| पनवेल | ६९ | २८१ | १६ | ०-००-०५ | ००.०३ |
| | | २८६ | बी (पी) | ०-११-०४ | |
| पनवेल | ४४८ | १९६ | -- | १-२६-०७ | १३.६९ |
| | | १९७ | -- | ३-०८-०१ | ३१.८१ |
| | | १९८ | १ | २-१७-०८ | २३.१२ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.अशोक कृष्णाजी भुजबळ व इतर यांना मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.एच.बी.४, सेक्टर नं.१५ ए, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र ५००.१४ चौ.मी. व मौजे : कामोठे / पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे अंदाजे ५०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वितरित करण्यात येणार आहे.

कै.अशोक कृष्णाजी भुजबळ यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

अ) सदनिका नं.७०२, सातवा मजला, यशोधन को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.३३ व ३४, पोदी नं.२, सेक्टर नं.१५ ए, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड आणि पार्कींग नं.७.

ब) सदनिका नं.११, सि-विंग, ४ ए बिल्डींग, शिवनेरी, को.ऑ.हौ.सो. लि., कामधेनू इस्टेट, हडपसर, पुणे ४११०२८

क) गाळा नं.१ ते ५, तळमजला, भागीरथी को.ऑ.हौ.सो.लि, व्लॉट नं.एचबी-४, सेक्टर नं.१५ ए, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड

ड) 'विठाई' बंगलो, प्लॉट नं.एचबी-४, सेक्टर नं.१५ ए, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड

इ) पनवेल महानगरपालिका मालमत्ता क्र. V3Z5004370 (जुना घर मिळकत नं.६४), पोदी नं.२, सेक्टर नं.१५ ए, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड

तसेच कै.अशोक कृष्णाजी भुजबळ यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या जंगम मिळकती आहेत.

अ) टाटा सुमो गाडी : रजिस्ट्रेशन नं.एम.एच.१२-एएक्स-९६०५.
ब) टोयाटो इनोव्हा क्रिस्टा गाडी : रजिस्ट्रेशन नं.एम.एच.४६-बीके-२१२१

श्रीमती.सुनंदा अशोक भुजबळ वगैरे हे कै.अशोक कृष्णाजी भुजबळ यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती. सुनंदा अशोक भुजबळ वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.अशोक कृष्णाजी भुजबळ यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२५/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोटाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

अॅड.संजय के. कानडे
अॅड.अनिल आर. नागदेवे
अॅड.गौरव संजय कानडे
अॅड.अभिजीत मं. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.७५३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०८/२०२१

कै.लिलावती सुधीर पवार (मयत) यांचे वारस
१) श्री.मोहन सुधीर पवार
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.रोहन सुधीर पवार
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्रीमती.मधुमती सुरेश कोरन
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्रीमती.वैजयंती धनाजी कोरन
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
१ ते ४ सर्व रा.घर क्र.६२/६३,
से.१५ ए, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.कविता हरिकृष्णन वारीयन
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.४०४, श्रीगणेश अपार्टमेंट, प्लॉट नं.६५,
से.२ ए, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.अनिता विकास चिखले
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.६८/बी, मकबरा रोड, कार्ला
मस्जिद जवळ, कल्याण (पश्चिम), जि.ठाणे
७) सौ.वैदेही हेमंत कुलकर्णी
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.३०४, ओम विघ्नेश को.ऑप.हौ.सो.लि.,
लेले लेन, भट्टाचार्य चौक, कल्याण (पश्चिम), जि.ठाणे — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. लिलावती सुधीर पवार यांचे दि.०५/०८/२०२० रोजी नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झालेले आहे. कै.लिलावती सुधीर पवार यांचे सामाईक मालकीची खालील वर्णनाची स्थावर मिळकत आहे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| मिळकत | किंमत (महानगरपालिका असेसमेंट प्रमाणे) |
|---|---|
| घर क्र.६२, V3Z50 से.१५ ए, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | रक्कम रु.१,९२६/- |

सबब वरील मिळकतीसाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत, तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार हे कै.लिलावती सुधीर पवार यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास अर्जदाराला वारसदाखला मंजूर करण्यात येईल.

आज दि.२३/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोटाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.राव साहेब

अॅड.योगिता पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अ.क्र.७८९/२०२१
नि.नं.१०/ड
ने.ता.३०/०९/२०२१

श्रीमती.नंदा अशोक शिंदे
वय : ५९ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.ए-१०२, दत्तकृपा को.हो.सो.,
प्लॉट नं.-६६, केंद्रीय विहार जवळ,
से.११, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्रीमती.पार्वती नेताजी शिंदे
वय : ९२ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.मु.पो.चिंचोली, ता.बार्शी, जि.सोलापूर-४१३४०४
२) श्री.कुलदीप अशोक शिंदे
वय : ३६ वर्षे, व्यव : नोकरी
रा.ए-१०२, दत्तकृपा को.हो.सो.,
प्लॉट नं.६६ केंद्रीय विहार जवळ,
से.११, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.संदीप अशोक शिंदे
वय : ३९ वर्षे, व्यव : नोकरी
रा.ए-१०२, दत्तकृपा को.हो.सो.,
प्लॉट नं.६६, केंद्रीय विहार जवळ,
से.११, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा मयत कै.अशोक नेताजी शिंदे यांचा मृत्यू दि.७/६/२०१० रोजी चिंचोली, ता.बार्शी, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार या मयत कै.अशोक नेताजी शिंदे यांच्या पत्नी आहेत. तसेच सामनेवाला क्रं.१ या कै.अशोक नेताजी शिंदे यांच्या आई आहेत. सामनेवाला क्रं.२, ३ ही मुले आहेत. अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मिळकत धारकाचे नाव : कै.अशोक नेताजी शिंदे (५०% हिस्सा)**
**फ्लॅट क्रं.बी-६/0:२**
**घरकूल, से.१५, खारघर,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**अॅग्रीमेंट व्हॅल्यू-रु.४,६५,000/-**
**(रुपये चार लाख पासष्ट हजार)**
**५0% हिस्सा-अॅग्रीमेंट व्हॅल्यू-रु.२,३२,५00/-**
**(रुपये दोन बत्तीस हजार पाचशे)**
**एकूण क्षेत्रफळ-४0.९७ चौ.फूट**

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात हजर राहून आपली हरकत कळवावी. आणि या लेखी नोटीस वरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी हरकत दाखल न केल्यास सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.अशोक नेताजी शिंदे यांचा वारस घोषित करेल. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मा.कोर्ट अर्जदार यांस वारस प्रमाणपत्र प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्याा हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२६/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील अॅड.एकनाथ जी. खुटले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.२ रे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१०९३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०९/२०२१

१) श्रीमती.लिलाबाई कृष्णा गायकवाड, वय : ६६ वर्षे
२) श्री.धनराज कृष्णा गायकवाड, वय : ५७ वर्षे
३) श्री.संतोष कृष्णा गायकवाड, वय : ४२ वर्षे
४) सुरेखा कृष्णा गायकवाड, वय : ३७ वर्षे
क्र.१ ते ४ रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.सपना सचिन पाटील, वय : ३९ वर्षे
रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.कृष्णा गणपत गायकवाड हे दि.१०/०५/२०२१ रोजी मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी, अर्ज केलेला आहे.

**जमिनींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| ओवळे-८४ | १३ | ३ | ०-३०-६ |
| | १४२ | २ ब | ०-१४-७ |
| | १४२ | १२ अ | ०-११-६ |

सदर मिळकतींचे संपादनाच्या मोबदल्यात खालील वर्णनाचा भूखंड वाटप झालेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक | ३ | ४१२ | ८८० |

अर्जदार या कै.कृष्णा गणपत गायकवाड यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.२५/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोटाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मुजावर साहेब

अॅड.शेखर खोपकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१०१३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१४/१०/२०२१

श्रीमती.वंदना शशिकांत तेंडुलकर
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.सी-११, तिसरा मजला,
अशोका गार्डन, टिळक रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.अभिषेक शशिकांत तेंडुलकर
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.फ्लॅट नं.सी-११, तिसरा मजला,
अशोका गार्डन, टिळक रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.मुग्धा महेश सिंकर
उर्फ आरती शशिकांत तेंडुलकर
वय : २५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.डी-२, एस-४, तेज्वलय को.हौ.सोसायटी,
सिपला फाऊंडेशन वार्जे जवळ, पुणे — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती व सामनेवाला यांचे वडील मयत शशिकांत पद्माकर तेंडुलकर हे दि.०७/०२/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मृत्यूसमयी मयत शशिकांत पद्माकर तेंडुलकर यांच्या सामाईक मालकीची व हिश्श्याची खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**अवदूत अर्पाटमेंट, फ्लॅट नं.ए-५, पहिला मजला,**
**क्षेत्र ३३७ चौ.फूट बिल्टअप,**
**पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत शशिकांत पद्माकर तेंडुलकर यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभात वारस दाखला प्रदान करण्यात येईल हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.२५/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोटाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

श्री.भाकरे सो.कोर्ट

अॅड. एम.एस.पवार

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७१/२०२१
नि.नं.२१/ड
ने.ता.०४/१०/२०२१

१) श्री.पांडुरंग पुंडलिक घरत
वय : वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.मु.कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.शनिदास पुंडलिक घरत
वय : ६० वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.४६४, देवळाची आळी, कोपर,
हनुमान मंदिर, गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
३) कै.अनंता पुंडलिक घरत
३/१) श्रीमती.संध्या अनंता घरत
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रो हाऊस नं.०५, जिम्मी पार्क,
अयपा मंदिर जवळ, सेक्टर १७, नेरुळ-४००७०६
३/२) श्री.रविराज अनंता घरत
वय : ३८ वर्षे, धंदा : विद्यार्थी
रा.५२८, गुमस्था नगर,
इंदौर मध्यप्रदेश-४५२००९
३/३) श्री.हर्षराज अनंता घरत
वय : १५ वर्षे, धंदा : विद्यार्थी
रा.रो हाऊस नं.०५, जिम्मी पार्क,
अयपा मंदिर जवळ, सेक्टर १७, नेरुळ-४००७०६
अर्जदार क्र.३/३ तर्फे अ.पा.करिता
श्रीमती.संध्या अनंता घरत
कै.गजानन पुंडलिक घरत (मयत) वारस
४) श्री.राजेश गजानन घरत
वय : ४५ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.१८३७, मु.कोपर, पो.गव्हाण,
सेक्टर ८, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.संगीता कैलाश घरत
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.७५/७८, दापोली
ता.पनवेल, जि.रायगड
६) श्री.लालचंद पुंडलिक घरत
वय : ६४ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.९८३, मु.कोपर, पो.गव्हाण,
ता.पनवेल, जि.रायगड
७) श्रीमती.प्रभावती हरिश्चंद्र ठाकूर
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.बी-१०३, कार्तिक्या गार्डन,
जरीमरी मंदिराजवळ, सुकापूर,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
कै.शेवंताबाई सावलाराम भगत (मयत) वारस
८) श्री.प्रशांत सावलाराम भगत
वय : ४३ वर्षे, धंदा : व्यवसाय
९) श्री.संतोष सावलाराम भगत
वय : ४१ वर्षे, धंदा : व्यवसाय
१०) श्रीमती.रंजना सावलाराम भगत
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार नं.८ ते १० सर्व रा.शेलगर,
पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, कै.गोमा उर्फ गंगा रामा घरत दि.२५/१०/१९८३ रोजी मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. त्यांच्या हयातीत त्यांच्या मालकीच्या मिळकती मे. विशेष भूसंपादन अधिकारी मेट्रो सेंटर पनवेल यांनी खालील वर्णनाची जमीन नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| गव्हाण-१६१ | ४४ | ३ | ०-३६-१२ | ३.७५ |
| गव्हाण-१६२ | ४७ | २ | ०-१६-१२ | १.७५ |

वरील वर्णनाच्या शेतजमिनी विशेष भूसंपादन अधिकारी यांनी संपादीत करून कै.गोमा उर्फ गंगा रामा घरत यांच्या नावे निवाडा जाहीर केलेला आहे. सदरच्या मिळकती सदरहू मयताच्या मालकीच्या होत्या व आहेत. शासनाच्या नियमानुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सिडकोच्या वतीने १२.५ टक्के योजनेंतर्गत विकसित भूखंड देणार असल्याने तसेच मयताच्या नावे सिडकोकडून काही विकसित भूखंड मिळणार असल्याने अर्जदार यांनी मयताचा वारस दाखला मिळण्याकरिता मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जातील जमिनीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य त्या पुराव्यासह स्वतः अगर आपल्या वकीलांमार्फत कोर्टात उपस्थित राहून हरकत घ्यावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास असे समजण्यात येईल की, वरील मिळकतीबाबत इतर कोणाचाही हक्क व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे व सदरहू अर्जदार ना.कोर्टातून योग्य तो हुकूम घेतील.

आज २६ माहे ०८ सन २०२१ रोजी आमच्या सह्या व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोटाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रासह उपकेंद्रात कर्मचाऱ्यांची १७ पदे रिक्त

## कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर येतोय कामाचा ताण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जिल्ह्यातील महत्वाच्या व मध्यवर्ती अशा नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात व या केंद्रांतर्गत असलेल्या उपकेंद्रात सुमारे १७ कर्मचाऱ्यांची विविध पदे रिक्त आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने पदे रिक्त असूनही मोठा कालावधी उलटूनही ही पदे जिल्ह्याच्या आरोग्य यंत्रणेकडून भरण्यात आलेली नाहीत. त्यामुळे नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण येत आहे. याशिवाय अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे नागरिकांना वेळेत आरोग्य सेवा देण्यात अडचणही येत आहे. त्यामुळे नागरिकांतून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई गोवा महामार्गावर सातत्याने घडणाऱ्या अपघातांमुळे रुग्णांना किमान प्राथमिक उपचार तरी वेळेत मिळण्यासाठी नागोठणे हे महत्वाचे प्राथमिक आरोग्य केंद्र समजले जाते. अपघातग्रस्त रुग्णांबरोबरच येथे दररोज उपचारासाठी येणाऱ्या बाह्य रुग्णांची संख्याही खूप मोठी आहे. याशिवाय सध्या कोरोना १९ च्या लसीकरणाचे कामही नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रासह सर्व उपकेंद्रात सुरु आहे.

त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे नागरिकांना आरोग्य सेवा देण्यात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. उपलब्ध माहितीनुसार नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात सद्य स्थितीत कनिष्ठ सहाय्यक पदाची एकमेव जागा रिक्त आहे. तर शिपायांच्या तीन पैकी दोन जागा रिक्त आहेत.

नागोठणे आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या सात उपकेंद्रातील महिला आरोग्य सेविकांची (एएनएम) केवळ ३ पदे भरलेली असून मेढा, पळस, ऐनघर व खांब या उपकेंद्रातील महिला आरोग्य सेविकेंची चार पदे रिक्त आहेत. तर पुरुष आरोग्य सेवकांचे (एमपीडब्लू) ६ पैकी केवळ एकाच पद भरलेले असून वणी, खांब, ऐनघर, यशवंतखार, मेढा या उपकेंद्रातील ५ पदे रिक्त आहेत. याशिवाय महिला आरोग्य सेविकांचे (एनएचएम) ६ पैकी केवळ एकच पद भरले असल्याने वणी, खांब, ऐनघर, यशवंतखार व पळस उपकेंद्रातील महिला आरोग्य सेविकांची ५ पदे रिक्त आहेत.

एवढ्या मोठ्या संख्येने उपकेंद्रातील आरोग्य कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांना अनेकवेळा कामासाठी उपकेंद्रात जावे लागत आहे. त्याचा परिणाम नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवेवर होत असल्याने रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. दरम्यान यासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, रिक्त पदांच्या जागी नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु असून ऑक्टोबर, २०२१ पर्यंत ही प्रक्रिया जिल्हा आरोग्य विभागाकडून पूर्ण करण्यात येईल असेही डॉ. सुधाकर मोरे यांनी स्पष्ट केले.

# संक्षिप्त...

## हुक्का पार्लर चालकासह १४ जणांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे सेक्टर-१९ मधील टुडे-शिवम या इमारतीत बेकायदेशीररीत्या सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर कामोठे पोलिसांनी छापा मारुन हुक्का ओढण्यासाठी बसलेल्या ग्राहकासह हुक्का पार्लर चालक अशा एकुण १४ जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत पोलिसांनी हुक्का ओढण्यासाठी लागणारे साहित्य व तंबाखुजन्य पदार्थ जफ्त केले आहे. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर राज्य शासनाने रेस्टारंट, बार व इतर आस्थापना सुरु ठेवण्यासंदर्भात नियम व अटी लागु केलेले असताना सदरचे हुक्का पार्लर बिनदिक्कतपणे सुरु ठेवण्यात आले होते.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने मनाई आदेश लागु करुन बार,रेस्टारंट सुरु ठेवण्यासाठी नियम व अटी घातल्या आहेत. असे असतानाही, कामोठे सेक्टर-१९ मधील टुडे शिवम या इमारतीतील शॉप नं. ७ मध्ये मध्यरात्री उशीरापर्यंत बेकायदेशीररीत्या हुक्का पार्लर सुरु असल्याची माहिती कामोठे पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे सहाय्यक पोलीस नाजुकाताई पाटील व त्यांच्या पथकाने कामोठे पोलिसांनी मध्यरात्री सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास सदर हुक्का पार्लरवर छापा मारला. यावेळी सदर हुक्का पार्लरमध्ये कोव्हीड-१९ च्या पार्श्वभुमीवर राज्य शासनाने लागू केलेल्या अधिसुचनांचे व अटिंचे उल्लंघन करण्यात आल्याचे आढळुन आले.

तसेच सदर हुक्का पार्लरमध्ये कुठल्याही प्रकारचे सामाजिक अंतर न ठेवता, सदरचे हुक्का पार्लर बेकायदेशीररीत्या मध्यरात्रीपर्यंत सुरु ठेवण्यात आल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी सदर हुक्का पार्लरचा चालक रोहीत हरीलाल सचदेव (२७) व हुक्का पार्लरमध्ये काम करणारे ४ व्यक्ती तसेच त्याठिकाणी हुक्का ओढण्यासाठी बसलेले ९ ग्राहक अशा एकुण १४ जणांवर कोरोनाच्या परिस्थितीत नियमांचे उल्लंघन करणे यासह विविध कलमांखाली गुन्हे दाखल करुन त्यांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत पोलिसांनी हुक्का ओढण्यासाठी लागणारे साहित्य व तंबाखुजन्य पदार्थ जफ्त केले आहे.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## स्थानिकांच्या मागणीनुसार कर्जत ते माथेरान मिनीबसच्या वेळापत्रकात बदल

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कर्जत- माथेरान मिनीबसच्या वेळापत्रकात सोयीस्कर बदल करणेबाबत स्थानिक रहिवाशी व मिनी बसच्या प्रवाशी वर्गाच्या सोयीनुसार व मागणीनुसार कर्जत- माथेरान मिनी बसच्या वेळापत्रकामध्ये थोडा सोयीस्करबदल करणे गरजेचे होते याकामी माथेरान मधील काही राजकीय तसेच सामाजिक संघटनांनी कर्जत एसटी आगार व्यवस्थापक शंकर यादव यांना समक्ष भेटून लेखी निवेदने सादर केली होती.



सध्या कॉलेज बंद असल्याने पहाटे कर्जत हुन ५-१५ वाजता व माथेरानहुन ६-१५ ची मिनी बसची फेरी पूर्ण रिकामी असते त्यासाठी प्रवाश्यांच्या मागणीनुसार व सोईनुसार मिनीबसच्या प्रस्तावित वेळापत्रकाची मागणी २७ जुलै रोजी सामाजिक कार्यकर्ते नितीन विश्वनाथ सावंत यांनी निवेदन दिले होते तर नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांनी सुध्दा अनेकदा याबाबतीत कर्जत आगार प्रमुखांना निवेदन सादर केले होते,माथेरान मधील भाजपच्या कार्यकर्त्यांनी त्याचप्रमाणे मनसे अध्यक्ष संतोष कदम यांनी आपल्या सहका-यांसोबत निवेदन सादर केले होते या सर्वांच्या मागणीचा सारासार विचार करून शंकर यादव यांनी मिनीबसच्या वेळापत्रकात बदल केला आहे.

कर्जत ते माथेरान सकाळी -०६-०० सकाळी-०८-३० दुपारी-१२-०५ दुपारी-१४-३० सायंकाळी ०५-०० तसेच माथेरान ते कर्जत सकाळी -०७-१५, सकाळी- ०९-४५, दुपारी-१३-२०, दुपारी -१५-४५ सायंकाळी- १८-१० स्थानिकांच्या मागणीनुसार कर्जत -माथेरान मिनी बसचा स्टॉप नेरळ खांडा येथेच असावा जेणेकरून प्रवाशांना अगदी सोयीस्कर होऊ शकते यासाठी प्रवाशांनी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे ही बस काही दिवसांपूर्वी खांडा येथे स्टॉप घेत आहे त्यामुळे प्रवाशांना सोयीचे ठरत आहे.

# स्मिता हर्डीकर यांच्या 'दरवळ' काव्यसंग्रहाचे दिमाखदार प्रकाशन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

'दरवळ' या स्मिता हर्डीकर लिखीत काव्य संग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध अभिनेत्री सारिका नवाथे यांच्या शुभ हस्ते नेरुळ येथे करण्यात आले.



'दरवळ' या काव्य संग्रहास सुप्रसिद्ध लेखिका शैलजा शेवडे यांची प्रस्तावना लाभली असून या प्रकाशन सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेत्री अश्विनी कासार, साहित्य संपदाचे संस्थापक वैभव धनावडे, अमित हर्डीकर आदी मान्यवर उपस्थित होते. मुळच्या बदलापूर येथील पाटणकर यांच्या अध्यात्मिक, धार्मिक वारसा लाभलेल्या घराण्यातील असलेल्या आणि आता नेरुळ येथे वास्तव्यास असलेल्या स्मिता यांना लहानपणापासून लिखाण आणि वाचनाची आवड आहे. २५ ऑगस्ट या स्मिता हर्डीकर यांच्या पतीराजांच्या वाढदिवसादिवशी त्यांनी या काव्य संग्रहाचे प्रकाशन करून त्यांना एक प्रकारे कलात्मक भेट देवून हा काव्य संग्रह त्यांना समर्पित केला.

डिजीटल पर्व या युट्युब चॅनलवरुन हा प्रकाशन सोहळा ऑनलाईन साजरा करण्यात आला. यावेळी ऑनलाईन पद्धतीने नृत्य, गायन व गिटार वादन हे उपक्रम कार्यक्रमाची रंगत वाढविणारे ठरले. या आधीही स्मिता हर्डीकर यांचे अध्यात्मिक विचारांवर आधारीत ''वाडीतील तुळस'' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. कथा, चारोळ्या, वृत्तबद्ध कविता, गझल, लेख अशी त्यांची लेखन वैशिष्ट्य आहेत.

## शिवसैनिकांकडून नवघर व परिसरातील तलावाची स्वछता

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवसेना शाखा नवघर यांच्या वतीने उरण तालुक्यातील नवघर व परिसरातील सर्वाचे श्रध्दास्थांन असणाऱ्या आसरा देवीच्या तलावात वाड-वडीलां पासून श्री गणपती विसर्जन केले जात आहे. त्या तलावाची तसेच तलावाच्या बांधावरील झालेल्या गवताची, तलावात झालेली शेवाळ, तलावात भावीकांनी सोडलेले निर्माल्य बाहेर काढून सदर तलाव गौरी-गणपती विसर्जनासाठी साफसफाई केली. नवघरचे शिवसैनिकांनी यावेळी स्व मेहनतीने तलावची साफसफाई केली. यावेळी शिवसेनेचे रायगड जिल्हा परिषद सदस्य विजय राजाराम भोईर, ग्रामपंचायत सदस्य गणेश रमाकांत वाजेकर,शिवसेना शाखा प्रमुख अविनाश एकनाथ म्हात्रे व नवघर गावातील सर्व शिवसैनिक व युवा शिवसैनिक हजर होते. यावेळी शिवसैनिकांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वतः तलावांमध्ये उतरून साफसफाई केली.

## ग्रामपंचायत सावळे

**ता. पनवेल, जि. रायगड**

**जाहीर सूचना सन २०२०/२०२१**

दिनांक : २५/०८/२०२१

ग्रामपंचायत सावळे ता.पनवेल, जि. रायगड हे ग्रामपंचायत सावळे हद्दीतील पुढील विकासकामे / साहित्य यांची अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा / कोटेशन मागवीत आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा स्वीकारण्याची तारीख | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | हनुमान माळी ते खत कारखाना रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | ९७८१२५.०० | ९७८१.०० | २६/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१ | ०३/०९/२०२१ सकाळी ११.३० वा. |
| २ | ग्रामपंचायत कार्यालयासमोर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | ४३६४२.०० | ४३७.०० | २६/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१ | ०३/०९/२०२१ सकाळी ११.३० वा. |
| ३ | रमाकांत माळी घरासमोरील परिसर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | ९३२१२.०० | ९३२.०० | २६/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१ | ०३/०९/२०२१ सकाळी ११.३० वा. |
| ४ | दत्तात्रेय केदारी ते धनाजी गायकवाड यांचे घर ग्रामपंचायत ऑफिस बंदीस्त गटर करणे | १६९६१३.०० | १६९६.०० | २६/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१ | ०३/०९/२०२१ सकाळी ११.३० वा. |
| ५ | रामचंद्र केदारी ते मेन गटरपर्यंत बंदिस्त गटर करणे | १५३९८९.०० | १५४०.०० | २६/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१ | ०३/०९/२०२१ सकाळी ११.३० वा. |
| ६ | योगेश कांबळे ते मेन गटर पर्यंत बंदीस्त गटर करणे | २४६२४६.०० | २६४२.०० | २६/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१ | ०३/०९/२०२१ सकाळी ११.३० वा. |
| ७ | केदार आळी सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे | ८५६३५२.०० | ८५६३.०० | २६/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१ | ०३/०९/२०२१ सकाळी ११.३० वा. |
| ८ | राजिप शाळा डिझीटल पेटींग करणे | कोटेशन | कोटेशन | २६/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१ | ०३/०९/२०२१ सकाळी ११.३० वा. |

१. निविदा मिळनेकारिता दि. २६/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.
२. अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दिनांक २६/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
३. भरलेल्या सीलबंद निविदा दिनांक ०२/०९/२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
४. आलेल्या निविदा दि. ०३/०९/२०२१ रोजी ११.३० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
५. इसारा रक्कम डिमांड डाफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत सावळे यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
६. मजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. व अंदाजपत्रक मिळणे कामी विनंती अर्ज केल्यावर व १०० रु. भरणा केल्यानंतर मिळेल.
८. निविदा पोष्ठाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
९. निविदा किंमत ना परतावा राहील.
१०. नियमा प्रमाणे आयकर भरावा लागेल.
११. अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केले जाईल.
१२. कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २.३३% आयकर, १% कर्मचारी विमा, ०.१५% सर चार्ज रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
१३. वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१४. झालेल्या तांत्रिक मुल्यांकना प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
१५. निविदा मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१६. मंजुर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायात देखारेखीखाली करायचे आहे.
१७, निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जमीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१८. सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१९. काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत,
२०. सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे.
२१. एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत सावळे, ता.पनवेल,जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत सावळे, ता.पनवेल,जि.रायगड**

# धर्मादाय आयुक्तांची सामाजिक बांधिलकी...!

**दै.रायगड नगरी । पनवेल**



महाराष्ट्रातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, सांगली, रायगड व इतर जिल्ह्यांमधे आलेल्या महापुरामुळे तसेच दरड कोसळल्याने अनेकांना आपले जीव गमवावे लागले आणि अनेक कुटुंब बेघर झालेली आहेत. पुरग्रस्थांचे अतोनात नुकसान झालेले आहे, शासन आपल्या परीने पुरग्रस्थांना मदत करत आहेच पण धर्मादाय आयुक्त श्री. प्र. श्रा. तरारे यांनी पुढाकार घेऊन राज्यातील सर्व धर्मादाय संस्थांना या कामी मदत करण्याचे आवाहन केले होते. सदर आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्रातील धर्मादाय संस्थांच्या माध्यमातून रुपये एक कोटी पेक्षा जास्तीची मदत जमा केली आहे त्याचाच एक भाग म्हणून रुपये तेहतीस लाख साठ हजारांचा धनादेश आज मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्री विकास खर्गे यांना धर्मादाय आयुक्त श्री प प्रा. श्री . तटारे यांनी सुपूर्द केला. धर्मादाय आयुक्त विभागाच्या बांधिलकीची सर्व स्तरांमधून कौतुक होत आहे. एका शासकीय विभागातून पुरग्रस्थांसाठी दाखवलेल्या संवेदनशीलतेसाठी सादर विभाग नक्कीच कौतुकास पात्र आहे. येत्या काळात असेच स्तृत्य उपक्रम करण्याचा मानस श्री. प्र. श्रा. तरारे यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

## वीस वर्षीय महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

साई आयकॉन साईड झोपडपट्टी, सेक्टर ३५ खारघर येथून २० वर्षीय महिला घरात कोणाला काहीही न सांगता निघून गेली आहे. तिची उंची पाच फूट, चार इंच, रंग सावळा, नाक बस्के, केस लांब व काळे आहेत. तिने अंगात लाल रंगाचा पंजाबी ड्रेस, पायात लाल रंगाची चप्पल घातलेली आहे. फरिदा खालीद मुल्ला असे या महिलेचे नाव असून तिच्याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार सचिन गोसावी ०२२२७७४२५०० यांच्याशी संपर्क साधावा.

सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**

पनवेल आणि उरण या तालुक्यातील सिडकोने नवी मुंबई प्रकल्पाकरिता जमिनी संपादित केलेल्या आहेत. अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना महाविद्यालयीन शिक्षणाकरिता सिडको महामंडळाच्या धोरणात्मक निर्णयानुसार विद्यावेतन दिले जाते. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यावेतनाचे अर्ज व्यवस्थापक (पुनर्वसन), सिडको लि., बेलापूर रेल्वे स्टेशन, टॉवर नं. ७, सातवा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ यांच्या कार्यालयात १ सप्टेंबर, २०२१ पासून उपलब्ध असून अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारिख दि. ३० नोव्हेंबर, २०२१ पर्यंत आहे.

विद्यावेतनाचा पूर्ण भरलेला अर्ज व्यवस्थापक (पुनर्वसन), सिडको लि., बेलापूर रेल्वे स्टेशन, टॉवर नं. ७, ७ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे सादर करावा. तसेच दि. ३०/११/२०२१ नंतर प्राप्त होणाऱ्या विद्यावेतन अर्जांचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**प्र. व्यवस्थापक (पुनर्वसन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१९६/२०२१-२२

## पाणी प्रकल्पात जमीन जाऊन सुद्धा आदिवासी बांधवाना प्रकल्पग्रस्त का घोषित केले नाही : मनसेचा सवाल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील कोंडीचीवाडी येथील आदिवासी बांधवांची देहरंग धरणामध्ये गेलेली जमीन त्या आदिवासीना परत द्यावी नाही तर रस्ते, पूल, लाइट पाणी या सुविधा उपलब्ध करून द्यावीत आणि जमीन पाणी प्रकल्पात जाऊन सुद्धा प्रकल्पग्रस्त का घोषित केले नाही असा सवाल पनवेल मनसेने विचारला आहे.

अशा प्रकारचे निवेदन पनवेल महापालिका, तहसील कार्यालयात देण्यात आले आहे. यावेळी संदेश भगत, विश्वास पाटील, दिनेश भगत, मारुती भगत, नामदेव भूकरे उपस्थित होते.

पनवेल येथील देहरंग धरणासाठी स्थानिक आदिवासींची जागा गेलेली आहे. मात्र येथील आदिवासी वाडयांचा विकास करण्यात आला नसल्याचा आरोप मनसेचे विश्वास पाटील-नेरे विभाग, अध्यक्ष यानी केला आहे. आदिवासी विभाग, रायगड यांच्याकडून कोंडीची वाडी येथे जाण्यासाठी पुलाच्या कामासाठी निधी मंजूर झाला होता, त्या संदर्भात त्वरित कार्यवाही होऊन काम सुरू करावे, देहरंग धरणामध्ये गेलेली जमीन आदिवासींना परत द्यावी नाही अन्यथा रस्ते, पूल, लाइट पाणी या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि येथील आदिवासी बांधवाना प्रकल्पग्रस्त घोषित करावं अशी मागणी दिलेल्या निवेदनत करण्यात आली आहे. अन्यथा बेमुदत उपोषण करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे.